# राज्यातील हवामान, खरीप हंगाम २०२० पिक परिस्थिती, रब्बी हंगाम २०२०-२१ पिक पेरणी व पिक परिस्थितीचा दिनांक ०४/०१/२०२१ अखेरचा साप्ताहिक अहवाल

**हवामान व पर्जन्यमान** : राज्यात अहवाल कालावधीत बहुतांश विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. कोंकण, नाशिक व कोल्हापूर विभागात तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाचा पाऊस झाला. हवामान थंड होते.

**खरीप हंगाम २०२०-२१ पिक परिस्थिती -**

राज्यात कापूस पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, वेचणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. तूर पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी कापूस पिकावर अमेरिकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळी, रस शोषणाऱ्या किडींचा, तूर पिकावर घाटे अळी, शेंगा पोखरणाऱ्या अळी, शेंग माशी व पाने व फुले गुंडाळणाऱ्या अळींचा प्रादुर्भाव दिसून आला.

दि.२१.१२.२०२० अखेरच्या प्राथमिक अहवालानुसार माहे, डिसेंबर-२०२० मध्ये झालेल्या अवेळी पावसामुळे ४ जिल्हयातील १०२७ हे. शेती पिके/फळ पिकांचे क्षेत्र बाधित झाले आहे. यामध्ये द्राक्ष, आंबा (मोहर), तूर, रब्बी ज्वारी या शेतीपिके व फळपिकांचा समावेश आहे.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

राज्यात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ५१.२० लाख हेक्टर असून दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर ५३.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर (१०४.७७%) पेरणी झाली आहे. गहू पिक मुकूटमुळे, निसवणे ते कांडी धरणेच्या अवस्थेत आहे. रब्बी ज्वारी पिक पोटरी ते फुलोऱ्याच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक फांदया फुटणे, फुलोरा तर काही ठिकाणी घाटे लागणे ते घाटे भरणेच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल व करडई पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. मका पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग-**

राज्यात काही ठिकाणी मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा तर हरभरा पिकावर घाटे अळी या किडीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम सन-२०२०-२१ मधील राज्यस्तरिय पेरणी क्षेत्र (लाख हे.) व टक्केवारी** (दि.०४ जानेवारी, २०२१ **अखेर**)



## रब्बी हंगाम सन-२०२०-२१ मधील पेरणी क्षेत्राचा सरासरी पेरणी क्षेत्राशी तुलनात्मक तक्ता (दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर)




## रब्बी हंगाम सन-२०२०-२१ मधील विभागनिहाय पेरणी क्षेत्राचा तुलनात्मक तक्ता (क्षेत्र लाख हे.) (दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर)



# विभागनिहाय पिक परिस्थिती

## कोकण विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात तूर पिकाची काढणी पूर्ण होत आली आहे.

**किड व रोग** - निरंक

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ०.३४ लाख हेक्टर असून, दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर ०.३२ लाख हेक्टर क्षेत्रावर (९३.३९%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा, वाल, चवळी, कुळीथ या पिकांच्या पेरणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. पेरणी झालेली पिके रोपे ते वाढीच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग** - निरंक

## नाशिक विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात कापूस पिकाच्या वेचणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. तूर पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत असून, काढणीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग** -

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, तूर पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळी, शेंगमाशी, घाटे अळी, पाने व फुले गुंडाळणाऱ्या अळींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.६७ लाख हेक्टर असून दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर ४.६८ लाख हेक्टर क्षेत्रावर (१००.३३%) पेरणी झाली आहे. विभागात रब्बी ज्वारी पिक पोटरीच्या अवस्थेत आहे. गहू पिक कांडया धरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक फांदया फुटणे, फुलोरा ते घाटे लागणेच्या अवस्थेत आहे. सुर्यफुल पिक फुलकळी लागणेच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग** -

विभागात काही ठिकाणी मका पिकांवर लष्करी अळीचा, हरभरा पिकावर घाटे अळी या किडीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

## पुणे विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र १४.४९ लाख हेक्टर असून दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर १०.४० लाख हेक्टर क्षेत्रावर (७१.८०%) पेरणी झाली आहे. विभागात ज्वारी पिक पोटरीच्या ते कणसांमध्ये दाणे भरणेच्या

अवस्थेत आहे. गहू पिक मुकूटमुळे ते निसवणेच्या अवस्थेत आहे. मका, सुर्यफुल व करडई पिके वाढीच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक फुटवे फुटणे ते घाटे लागणेच्या अवस्थेत आहे. पिकांची वाढ समाधानकारक आहे.

**किड व रोग –**

विभागात मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, हरभरा पिकावर घाटे अळी या किडीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

## कोल्हापूर विभाग

**हवामान–** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते. तसेच तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाचा पाऊस झाला.

**खरीप हंगाम–२०२०–२१**

विभागात तूर पिक शेंगा भरणे ते पक्वतेच्या अवस्थेत, तर काही ठिकाणी काढणी सुरु आहे. आडसाली ऊस पिक फुटवे ते जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी ऊस पिकावर मावा व हुमणी या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम–२०२०–२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ४.५९ लाख हेक्टर असून दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर ४.१० लाख हेक्टर क्षेत्रावर (८९.३९%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक फुटवे फुटणेच्या ते वाढीच्या अवस्थेत आहे. ज्वारी पिक पोटरीच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढीच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक फांदी फुटणे ते फुलोरा अवस्थेत आहे.

**किड व रोग –**

विभागात ज्वारी व मका पिकावर लष्करी अळीचा, हरभरा पिकावर घाटे अळी या किडीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

## औरंगाबाद विभाग

**हवामान–** अहवाल कालावधीत विभागात आकाश अंशत: ढगाळ होते.

**खरीप हंगाम–२०२०–२१**

विभागात कापूस पिकाच्या वेचणीची कामे पुर्ण झाली आहेत. तूर पिकाची काढणी व मळणीची कामे सुरु आहेत.

**किड व रोग –**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, अमेरिकन बोंड अळी, तूर पिकावर घाटे अळी या किडींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम–२०२०–२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ६.०५ लाख हेक्टर असून, दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर ८.१३ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३४.४६%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक कांडया अवस्थेत आहे. मका पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे. रब्बी ज्वारी पिक फुलोरा ते दाणे भरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक फुलोरा ते घाटे लागणेच्या अवस्थेत आहे. पिक परिस्थिती समाधानकारक आहे.

**किड व रोग –**

विभागात हरभरा पिकावर घाटे अळी या किडीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

## लातूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे व थंड होते.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात कापूस पिकाच्या वेचणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. तूर पिक शेंगा पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, तूर पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र १०.८७ लाख हेक्टर असून, दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर १४.२२ लाख हेक्टर क्षेत्रावर (१३०.८७%) पेरणी झाली आहे. विभागात रब्बी ज्वारी पिक पोटरीच्या अवस्थेत आहे. गहू पिक कांडया धरणे ते पोटरीच्या अवस्थेत आहे. मका पिक वाढीच्या ते पोटरीच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक फुलोरा ते घाटे लागणेच्या अवस्थेत आहे. करडई पिक वाढीच्या अवस्थेत आहे. पिकांची वाढ समाधानकारक आहे.

**किड व रोग -**

विभागात मका व ज्वारी पिकावर लष्करी अळीचा, गहू पिकावर तांबेरा या रोगाचा, हरभरा पिकावर घाटे अळी या किडीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

## अमरावती विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे व रात्रीच्या तापमानात घाट झाली आहे.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात कापूस पिक पक्वतेच्या अवस्थेत असून, वेचणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत. तूर पिक शेंगा पक्वतेच्या ते काढणीच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -**

विभागात काही ठिकाणी कापूस पिकावर रस शोषणाऱ्या किडींचा, अमेरिकन बोंड अळी, गुलाबी बोंड अळीचा, तूर पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा, पाने व फुले गुंडाळणारी अळी व शेंगमाशीचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ६.४६ लाख हेक्टर असून, दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर ७.१५ लाख हेक्टर क्षेत्रावर (११०.७०%) पेरणी झाली आहे. विभागात गहू पिक कांडी धरणेच्या अवस्थेत आहे. हरभरा पिक फुलोरा, घाटे धरणेच्या ते पक्वतेच्या अवस्थेत आहे. इतर पेरणी झालेली पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. पिकांची वाढ समाधानकारक आहे.

**किड व रोग -**

विभागात हरभरा पिकावर घाटे अळी या किडीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

## नागपूर विभाग

**हवामान-** अहवाल कालावधीत विभागात आकाश निरभ्र होते. हवामान कोरडे व रात्रीच्या तापमानात घाट झाली आहे.

**खरीप हंगाम-२०२०-२१**

विभागात कापूस पिकाच्या अंतिम वेचणीची कामे सुरु आहेत. तूर पिक शेंगा धरणे ते पक्वतेच्या अवस्थेत आहे.

**किड व रोग -**

विभागात कापूस पिकावर गुलाबी बोंड अळी, तूर पिकावर पाने व फुले गुंडाळणारी अळी, घाटे अळी, शेंगमाशी, शेंगा पोखरणाऱ्या अळींचा प्रादुर्भाव दिसून आला.

**रब्बी हंगाम-२०२०-२१**

विभागात रब्बी पिकाखालील सरासरी क्षेत्र ३.७४ लाख हेक्टर असून, दि.०४ जानेवारी, २०२१ अखेर ४.६४ लाख हेक्टर क्षेत्रावर (१२३.८४%) पेरणी झाली आहे. विभागात हरभरा पिक फुलोरा ते घाटे लागणेच्या अवस्थेत आहे. गहू पिक वाढीच्या ते कांडया धरणेच्या अवस्थेत आहे. इतर पेरणी झालेली पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.

**किड व रोग -**

विभागात मका पिकावर लष्करी अळीचा, हरभरा पिकावर घाटे अळी या किडीचा व मर या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आला.

महाराष्ट्र राज्यातील रब्बी हंगाम २०२०-२१ मधील मुख्य पिकाखालील दि.०४.०१.२०२१ अखेरचा पिक पेरणी अहवाल.

(क्षेत्र हेक्टर मध्ये)

| अ.क्र. | पिके | सरासरी क्षेत्र (२०१४-१५ ते २०१८-१९) | मागिल वर्षाची पेरणी दि.०३/०१/२०२० | प्रत्यक्ष पेरलेले क्षेत्र | पेरलेल्या क्षेत्राची सरासरी क्षेत्राशी टक्केवारी | पेरलेल्या क्षेत्राची मागिल वर्षाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रब्बी ज्वारी | २०२७२५८ | १७१७९६२ | १५८३८६४ | ७८.१३ | ९२.१९ |
| २ | गहू | ८७५६३३ | ८६१३४१ | १००३३९४ | ११४.५९ | ११६.४९ |
| ३ | मका | २६३८९६ | १७८७४७ | २८५९८५ | १०८.३७ | १५९.९९ |
| ४ | इतर रब्बी. तृणधान्ये | १४९२१ | ६०४६ | ९७८८ | ६५.६० | १६१.८९ |
|  | **एकुण रब्बी. तृणधान्ये** | **३१८१७०८** | **२७६४०९५** | **२८८३०३०** | **९०.६१** | **१०४.३०** |
| ५ | हरभरा | १७४३२५९ | १९६५९५१ | २२९४३६९ | १३१.६१ | ११६.७१ |
| ६ | इतर रब्बी. कडधान्ये | १०५७०४ | १०३०७१ | १४७२१७ | १३९.२७ | १४२.८३ |
|  | **एकुण रब्बी कडधान्ये** | **१८४८९६३** | **२०६९०२१** | **२४४१५८६** | **१३२.०५** | **११८.०१** |
|  | **एकूण रब्बी अन्नधान्ये** | **५०३०६७२** | **४८३३११७** | **५३२४६१६** | **१०५.८४** | **११०.१७** |
| ७ | करडई | ४६४६५ | २०९८५ | १८९८७ | ४०.८६ | ९०.४८ |
| ८ | जवस | १६६६९ | ७५१७ | ६२५८ | ३७.५४ | ८३.२५ |
| ९ | तीळ | १६३० | ६३६ | १३२२ | ८१.०९ | २०७.९३ |
| १० | सुर्यफुल | १४४१६ | २४९४ | २६७८ | १८.५७ | १०७.३९ |
| ११ | इतर रब्बी तेलबीया | १००४५ | ४९६१ | १०२५३ | १०२.०७ | २०६.६८ |
|  | **एकूण रब्बी तेलबीया** | **८९२२७** | **३६५९२** | **३९४९७** | **४४.२७** | **१०७.९४** |
|  | **राज्यातील एकुण पीकाखालील पेरणीचे क्षेत्र** | **५११९८९८** | **४८६९७०९** | **५३६४११४** | **१०४.७७** | **११०.१५** |

टिप - पेरणी क्षेत्र नजर अंदाजित